**ठळक बातम्या**

- राज्यातल्या नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी क्षेत्रात मालमत्ता करावरचा दंड अंशतः माफ करून कर वसुलीसाठी अभय योजना राबवण्यात येणार

- दिव्यांग युवांच्या कौशल्य विकास आणि तांत्रिक प्रशिक्षणासाठी राज्यशासनाने केले तीन सामंजस्य करार

- बालकांच्या तस्करीच्या प्रकरणांमधे जलद सुनावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाचे दिशानिर्देश जारी

- महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक ग.दि.कुलथे यांचं निधन

**आणि**

- बुलडाणा जिल्ह्यात रस्ता अपघातात ४ जणांचा मृत्यू, १० जण जखमी

**<><><><><>**

राज्यातल्या नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी क्षेत्रात मालमत्ता करावरचा दंड अंशतः माफ करून कर वसुलीसाठी अभय योजना लागू करण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतला आहे. त्याकरता नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये आवश्यक सुधारणा करायला आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी मिळाली. ठाणे जिल्ह्यात चिखलोली – अंबरनाथ इथं दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक पदांना आज राज्यमंत्रिमंडळाने मंजुरी दिली. कोठडीत कैद्याचा मृत्यू झाल्याप्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणालाही आज मंजुरी देण्यात आली. भूमिसंपादन, पुनर्वसन आणि

पुनर्वसाहत करताना अधिग्रहीत जमिनींचा मोबदला देताना विलंब झाल्यास आकारण्यात येणार्या  व्याजदरांच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला.

**<><><><><>**

दिव्यांग युवांच्या कौशल्य विकास आणि तांत्रिक प्रशिक्षणासाठी आज तीन सामंजस्य करार झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या उपस्थितीत हे करार करण्यात आले. या करारा अंतर्गत प्रोजेक्ट मुंबई ही स्वयंसेवी संस्था दिव्यांग युवांना तांत्रिक प्रशिक्षण देणार आहे. या प्रशिक्षणाचा कालावधी तीन वर्षांचा असेल.

**<><><><><>**

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पाचव्या बटालियनने आज राज्यात  अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी आणि आपत्ती प्रतिसाद विषयक सराव आयोजित केले होते. पूर, दरडी कोसळणे, भूकंप तसंच रासायनिक अपघातांना त्वरित प्रतिसाद देऊन कृती करण्याच्या  या सरावात १२ विशेष प्रशिक्षित पथकं सहभागी झाली होती. येत्या पावसाळ्यासाठी या पथकांची सज्जता तपासणं हा या सरावांमागचा हेतू होता.

**<><><><><>**

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर मार्च महिन्यात कमी होऊन २ पूर्णांक ५ शतांश टक्क्यांवर पोहोचला आहे. हा दर फेब्रुवारीत २ पूर्णांक ३८ शतांश टक्के इतका होता. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं आज ही आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. घाऊक किंमत निर्देशांकातल्या गरजेच्या वस्तूंवरचा वार्षिक महागाई दर फेब्रुवारीतल्या २ पूर्णांक ८१ शतांशवरून खाली येऊन मार्चमध्ये ७६ शतांश टक्के इतका झाला आहे. तर, अन्न निर्देशांकाचा वार्षिक

महागाई दर गेल्या महिन्यात ४ पूर्णांक ६६ शतांश टक्के होता, तो या महिन्यात ५ पूर्णांक ९४ शतांश टक्क्यांवर आला आहे.

<><><><>

'आपल्या आधुनिक प्रजासत्ताकाच्या बांधणीसाठी डॉ आंबेडकरांनी आपलं आयुष्य वेचलं होतं', असं भारताचे संयुक्त राष्ट्रसंघातले स्थायी प्रतिनिधी पर्वतनेनी हरीश यांनी म्हटलं आहे. अमेरिकेत संयुक्त राष्ट्रसंघाच्या न्यू यॉर्क इथल्या कार्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले आणि इतर मान्यवरांनी आपले विचार मांडले.

दरम्यान, १४ एप्रिल २०२५ चा दिवस 'डॉ बाबासाहेब आंबेडकर दिन' म्हणून साजरा केला जाईल असे आदेश न्यूयॉर्कच्या महापौरांनी दिल्याचं त्यांच्या कार्यालयाने घोषित केलं आहे.

<><><><>

भारतीय प्रशासन सेवेच्या २०२३ साली निवड झालेल्या सनदी अधिकाऱ्यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. अधिकाऱ्यांनी स्थानिक पातळीवर चालवलेल्या समाजकल्याण आणि विकासकामांमुळे राष्ट्रीय उद्दिष्टपूर्तीत मोठी मदत होत असते. अधिकाऱ्यांनी आपले हक्क आणि कर्तव्य यांच्यात समतोल साधून हक्कांचा वापर जबाबदारी पार पाडण्यासाठी करावा असा सल्ला राष्ट्रपती मुर्मू यांनी अधिकाऱ्यांना दिला.

<><><><>

देशभरात होणाऱ्या बाल तस्करीशी संबंधित गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि जलद सुनावणीसाठीची कठोर मार्गदर्शक तत्वं आज सर्वोच्च न्यायालयानं निश्चित केली. उत्तर प्रदेशातल्या बाल तस्करी प्रकरणातल्या आरोपींनी दाखल केलल्या अटकपूर्व जामीन अर्जांवर सुनावणी करताना न्यायालयानं यासंबंधीचे निर्देश दिले.

देशभरातल्या उच्च न्यायालयांनी बाल तस्करी प्रकरणातले खटले सहा महिन्यात निकाली काढावेत, न्यायदानात होणारा विलंब रोखण्यासाठी अशा प्रकरणांची सुनावणी सलग रोजच्या रोज घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. या निर्देशांची अंमलबजावणी करताना झालेला कोणताही हलगर्जीपणा हा न्यायालयाचा अवमान मानला जाईल, असा ताकीदही न्यायालयाने दिली आहे. बालतस्करी प्रकरणांची हाताळणी अयोग्य पद्धतीने केल्याबद्दल उत्तर प्रदेश सरकार आणि आरोपींना जामीन देणाऱ्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने यावेळी टीकाही केली.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक ग.दि.कुलथे यांचं काल नवी मुंबईतल्या राहत्या घरी हृदयविकाराने  निधन झालं. ते ८७वर्षांचे होते. राज्य शासकीय राजपत्रित अधिकारी संघाचं त्यांनी प्रदीर्घकाळ नेतृत्व केलं. त्यांनी स्थापन केलेली ही संघटना राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी आपापली गाऱ्हाणी मांडण्याकरता उपयुक्त व्यासपीठ ठरलं. सेवानिवृत्तीनंतरही ते संघटनेचे सल्लागार म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पार्थिवावर नेरुळ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

प्रशासनात पारदर्शकता, संवेदनशीलता, आणि जबाबदारीची भावना रुजवण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. शासकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचाराला बळी पडू नये, सचोटीनं वागावं, यासाठी प्रबोधनावर भर दिला. त्यांच्या नेतृत्वात सुरू झालेली ‘पगारात भागवा’सारखी चळवळ अनोखी ठरली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ग. दि. कुलथे यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

बुलडाणा जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वर बस आणि ट्रक चा अपघात होऊन ४ जणांचा मृत्यू झाला तर १० जण गंभीररीत्या जखमी झाले. जखमींना खामगाव इथल्या रुग्णालयात दाखल केलं आहे. मध्यप्रदेश परिवहन निगमची बस अकोल्याहून नांदुराकडे जात असताना समोरुन येणाऱ्या मालवाहू वाहनाशी टक्कर झाल्याने अपघातग्रस्त झाली. ट्रकमधल्या ३ मजुरांचा मृतांमधे समावेश आहे.

**<><><><><>**

डिजिटल अटक प्रकरणात सहभागी असलेल्या चार जणांना सीबीआयने आज अटक केली आहे. राजस्थानमधल्या झुंझुनू इथे ४ महिने डिजिटल अटकेत राहिलेल्या पीडित व्यक्तीच्या तक्रारीवरून सीबीआयने चौकशी सुरु केली होती. त्यासाठी महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि राजस्थानात शोध मोहीम राबवून ही अटक केली आहे. काही सायबर गुन्हेगारांनी या पीडित व्यक्तीला फसवून ७ कोटींहून अधिक रक्कम हडप केली होती. या शोधमोहिमांमध्ये अनेक डेबिट कार्ड्स, चेकबुक आणि डिजिटल उपकरणे सापडली आहेत.

**<><><><><>**

निलंबित आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर हिला सर्वोच्च न्यायालयाने २१ एप्रिलपर्यंत अटकेपासून संरक्षण दिलं आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांच्या पीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. दिल्ली उच्च न्यायालयाने पूजा खेडकर हिचा अटकपूर्व जामीन फेटाळला होता, त्या निर्णयाविरोधात खेडकर हिने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

**<><><><><>**

भारतातून हज यात्रेला जाणाऱ्यांचा कोटा वाढवून आता १ लाख ७५ हजार केला असल्याची माहिती केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्रालयाने दिली आहे. हा कोटा २०१४ पासून १ लाख ३६ हजार यात्रेकरूंचा होता. मंत्रालयाने हज कमिटीमार्फत १ लाख २२ हजार यात्रेकरूंच्या विमान तिकीटांची आणि इतर व्यवस्था सौदी

अरेबियाच्या नियमांप्रमाणे केली असून उरलेल्या यात्रेकरूंची व्यवस्था खाजगी यात्रा कंपन्यांकडे सोपवली असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी २० क्रिकेटमध्ये, आज पंजाब सुपर किंग्ज चा सामना कोलकाता नाईट राईर्डसबरोबर होणार आहे. पंजाबच्या चंदीगढ स्टेडियमवर आज संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

**<><><><><>**

यंदाच्या अमरनाथ यात्रेसाठी जम्मू काश्मीरमधे आजपासून नोंदणी सुरु झाली. श्री अमरनाथजी श्राईन बोर्डाच्या संकेतस्थळावरुन नोंदणीला कालच सुरुवात झाली. देशभरातल्या निवडक ५४० बँकशाखांमधेही यात्रेसाठी नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यात्रेसाठी नोंदणी करणं अनिवार्य आहे. सर्व यात्रेकरुंना तंदुरुस्तीचं प्रमाणपत्र, आणि इतर कागदपत्रं सादर करावी लागतील. रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेन्टीफिकेशन कार्ड बाळगणं बंधनकारक आहे. प्रतिदिन केवळ १५ हजार यात्रेकरुंना परवानगी असेल. अनंतनाग जिल्ह्यातल्या पहलगाम मार्गे आणि गंदेरबाल जिल्ह्यातल्या बालताल मार्गावरुन यात्रा येत्या ३ जुलै पासून सुरु होईल.

५२ दिवस चालणारी ही यात्रा रक्षाबंधनाच्या दिवशी येत्या ९ ऑगस्टला समाप्त होईल. जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी गेल्या ५ मार्चला यात्रेचा कार्यक्रम जाहीर केला होता. उत्तराखंडमधल्या चारधाम यात्रेसाठी देखील आजपासून नोंदणी सुरु झाली आहे.

***//<><><><><>//***